**नियमित दिवाणी दावा क्र. ५५/२०१३ मधील**
**नि.क्र. ६५ वरील आदेश**

श्रीमती यल्लुबाई गणपती आंबेवाडकर वि. सौ. बेबी आनंदा आंबेवाडकर

प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापनाकरिता व निरंतर मनाई हुकूमाचा आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६, नियम १७ अन्वये, नि.क्र. ६५ वर दाखल केलेल्या या अर्जाद्वारे वादी हे वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मागत आहे. अर्जात नमुद कथन संक्षिप्तपणे पुढीलप्रमाणे विषद करता येईल. वादी कथन करतात की, प्रतिवादी क्र. ८ याने वाद मिळकतीमध्ये वादींनी सन २०२०–२१ मध्ये केलेले ऊसाचे पिक बेकायदेशीरपणे तोड करून पळवून नेऊन ते त्याचा मित्र नायकु शिवाप्पा गणेशगोळ याचे नावे ओलम साखर कारखाना, राजगोळी खुर्द, ता. चंदगड येथे दिले आहे. सदर नायकु गणेशगोळ यास दाव्यात समाविष्ट करण्यासाठी वादींनी वेगळा अर्ज दिला आहे. त्यामुळे, वादींनी मुळ दाव्यातील परिच्छेद क्र. ७ नंतर ७–अ असा समाविष्ट करून प्रस्तुत अर्जात परिच्छेद क्र. २ व ३ मध्ये नमुद प्रमाणे दुरूस्ती मूळ वादपत्रातील परिच्छेद क्र. ७ नंतर ७(अ) व परिच्छेद क्र. १२ मध्ये व परिच्छेद क्र. ९(क) नंतर ९(क)(१) असे करून करण्याची परवानगी मागितली आहे. वादी पुढे कथन करतात की, सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही, मात्र अशी दुरुस्ती करण्यास वादीस परवानगी दिली नाही तर, वादींचे अतोनात व कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट, प्रतिवादींची कोणतीच हानी होणार नाही. यास्तव, वादीने उपरोक्तप्रमाणे दुरुस्ती मागितली आहे. अर्जासोबत वादी क्र. १ यांचे शपथपत्र जोडले आहे.

२. अर्जाच्या तळाशी प्रतिवादी क्र. ८ यांनी खुलासा सादर केलेला आहे. तथापि, उर्वरित प्रतिवादी यांनी अर्जास विहित अवधीत त्यांचा खुलासा सादर न केल्याने या अर्जाची चौकशी त्यांच्या खुलाशाशिवाय घेण्यात आली. प्रतिवादी क्र. ८ कथन करतात की, वादींचा प्रस्तुतचा अर्ज हा कोणत्याही कागदोपत्री पुराव्याव्यतिरिक्त न्यायालयात दाखल केलेला असल्याने सदरचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची प्रतिवादी क्र. ८ यांनी विनंती केली आहे.

३. वादीतर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. एन. जी. आजरेकर यांचा व प्रतिवादी क्र. ८ तर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. एस.एन. फगरे यांचा युक्तिवाद ऐकला.

४. वादींनी प्रस्तुतचा अर्ज ज्या तरतुदीच्या अनुषंगाने दाखल केली आहे ती तरतुद पाहणे आवश्यक ठरते. सदर तरतुद म्हणजे दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ६, नियम १७ पुढीलप्रमाणे उध्दृत करते. :-

> ''१७. न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोहोंपैकी कोणत्याही पक्षकारास, त्याच्या वादकथनास न्याय्य असेल अशा रितीने व अशा अट्टींवर बदल करण्याची किंवा दुरुस्ती करण्याची मुभा देता येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न अभिनिर्णित करण्यासाठी आवश्यक असतील त्याप्रमाणे अशा सर्व दुरुस्त्या केल्या पाहिजेत.
>
> परंतु, वाजवी दक्षता बाळगुन सुध्दा, वादाची चौकशी आरंभ होण्यापूर्वी, तो पक्ष, अशी दुरुस्ती मागणी करु शकली नाही असे न्यायालय निष्कर्षाप्रत आल्याशिवाय, दाव्याच्या सुनावणीची सुरुवात झाल्यानंतर, असा दुरुस्तीचा अर्ज मान्य करता येणार नाही.''

५. उपरोक्त तरतुदीचे काळजीपूर्वक अवलोकन करता, दाव्याच्या प्रभावी सुनावणीस सुरुवात झाल्यानंतर, संबंधित पक्षकार वाजवी दक्षता बाळगुन सुध्दा, अशा प्रकारची दुरुस्ती करण्यास सक्षम नव्हता याबाबत न्यायालय निष्कर्षाप्रत आल्याशिवाय वाद प्रकरणाच्या प्रभावी सुनावणी सुरु झाल्यानंतर असा दुरुस्तीचा अर्ज मान्य करता येणार नाही हे स्पष्ट होते. त्यामुळे, उपरोक्त तरतुदीनुसार हे स्पष्ट आहे की, न्यायालयास प्रकरणाच्या कोणत्याही टप्प्यावर वाद कथनांमध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देण्याचा अधिकार आहे. मात्र अशी दुरुस्ती वादातील पक्षकारांमध्ये असणा-या वादप्रश्नांचे निराकरण करण्यास अथवा निश्चित करण्यास आवश्यक असले पाहिजे. तथापि, सदर तरतुदीखाली असणा-या परंतुकानुसार, अशी दुरुस्ती मागणी करणा-या पक्षकाराने वाजवी दक्षता बाळगून सुध्दा संबंधित पक्षकार वादाची चौकशी सुरु होण्यापूर्वी अशी दुरुस्ती मागण्यास असमर्थ होता असे न्यायालयाचे निष्कर्ष झाल्याशिवाय अशी दुरुस्ती दाव्याची चौकशी सुरु झाल्यानंतर मान्य करु नये.

६. प्रस्तुतच्या दाव्याचे काम हे प्रतिवादी क्र. १ ते ४, ६ व ८ यांच्याविरूद्ध विनाबचावपत्र चालत असून प्रतिवादी क्र. ७ विरुद्ध एकतर्फी चालत आहे. प्रतिवादी क्र. ५ यांनी नि.क्र. ३५ वर सादर केलेल्या बचावपत्राव्दारे वादींचा दावा मान्य केला आहे. त्यामुळे, प्रस्तुत प्रकरणात न्यायालयाने वाद मुद्दे काढलेले नाहीत. दाव्यात एकूण आठ प्रतिवादी असून प्रतिवादी क्र. ९ असा कोणताच पक्षकार दाव्यात नाही. वादींनी नि.क्र. ६४ वर दाव्यात पक्षकार म्हणून सामिल करण्याचा दाखल केलेला अर्ज या न्यायालयाने दि. १७/०१/२०२२ रोजीच्या आदेशाव्दारे निरसित केला आहे. वादींनी प्रस्तुतचा अर्ज सादर करताना त्यांचा नि.क्र. ६४ वरील अर्ज न्यायालयाने मान्य केला आहे असे गृहीत धरून सदर अर्ज दाखल केल्याचे सकृतदर्शनी दिसत आहे. प्रस्तुत अर्जात मागणी केलेली प्रस्तावित दुरूस्ती ही त्या प्रस्तावित प्रतिवादीविरूद्ध अनुतोष मागण्यासाठीची

असल्याचे पारदर्शकपणे स्पष्ट होते. मुळातच वादींचा नि.क्र. ६४ वरील अर्ज या न्यायालयाने निरसित केल्यामुळे या अर्जाव्दारे वादींनी मागणी केलेली दाव्यातील दुरूस्ती अनावश्यक व गैरलागू ठरते. शिवाय, दाव्याचे वय पाहता प्रस्तुत दुरूस्ती मान्य झाल्यास प्रकरणाची प्रगती विपरीत दिशेने होणार असून त्यामुळे सुद्धा वादींचा दावा दुरूस्तीचा अर्ज व त्यातील मागणी अमान्य होण्यास पात्र ठरते. यास्तव, निम्न आदेश.

## आ दे श

नि.क्र. ६५ वरील वादपत्र दुरुस्तीचा अर्ज निरसित करण्यात येत आहे.

DISTRICT COURT, MAHARASHTRA

Digitally signed by Amrit Chandrakant Birajdar
Date: 2022.01.17 15:42:15 +0530

दि. १७/०१/२०२२ **(अमृत चं. बिराजदार)**
चंदगड दिवाणी न्यायाधिश क. स्तर, चंदगड

**<u>CERTIFICATE</u>**

I affirm that the contents of this P. D. F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. P.W. Ghodekar, L. G. Stenographer. |
| Name of Court | Shri. A. C. Birajdar,<br>Civil Judge, Junior Division and Judicial Magistrate, First Class, Chandgad. |
| Date of Dictation | 17/01/2022 |
| order signed by the P. O. on | 17/01/2022 |
| order uploaded on | 20/01/2022 |